Mumbai Chauffer
MFIN elects R Baskar Babu as new president
Edition: Mumbai Date: 09/07/2016 Page no: 8 Clip size: H: 9 cm / W: 6 cm

India Media Monitor

# मायक्रोफायनान्सच्या अध्यक्षपदी आर. भास्कर बाबू

मुंबई - मायक्रोफायनान्स इन्स्टिट्युट नेटवर्क (एमएफआएन) या भारतातील मायक्रोफायनान्स उद्योगाच्या प्रमुख उद्योग संघ आणि स्व-नियामक संघटनेने आर. भास्कर बाबू यांची नवीन अध्यक्ष म्हणून नेमणूक केली आहे. भास्कर बाबू हे सुर्योदय मायक्रोफायनान्समध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्य करत आहेत आणि त्यांची नेमणूक आरोहणचे मनोज नांबियार यांच्या जागेवर करण्यात आली आहे. मंडळाने एसव्हीसीएल क्रेडिटलीइन प्रावेट लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी राकेश दुबे यांची मायक्रोफायनान्स इन्स्टिट्युटचे नवीन उपाध्यक्ष म्हणून निवड केली आहे. नवीन अध्यक्ष भास्कर बाबू यांना आर्थिक सेवा आणि बँकिंग क्षेत्रात २२ वर्षांचा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी फर्स्ट लीझिंग, चोलामंडलम, एचडीएफसी बँक, जीए कॅपिटल यांसारख्या अनेक कंपन्यांमध्ये विविध पदांवर कार्य केले आहे.